चाणक्य मंडल परिवार

**प्रश्नपुस्तिका**

# अर्थशास्त्र

## Currency And Infalation

**वेळ : एक तास**

**एकूण प्रश्न : 50**

**एकूण गुण : 100**

---

**सूचना**

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

(3) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.

(4) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेतदेखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(6) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील".**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

चाणक्य मंडल परिवार

1) ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत काही मूलभूत संशोधन असते. त्यापैकी पैशाचा शोध महत्त्वपूर्ण असून मानवाच्या आर्थिक आयुष्यात क्रांतिकारी बदल घडवून आणणारा आहे. असा विचार कुणी मांडला?
1) क्राऊथर 2) वॉकर
3) सेलिग्मन 4) रॉबर्टसन
There is basic and fundamental invention in all branch of knowledge. The invention of money is one of the important invention and concept which has brought a revolutionary change in economic life of human being. Who proposed above thought?
1) Crowther 2) Walker
3) Selligman 4) Robertson

---

2) वस्तूविनिमयातील कुठल्या अडचणीमुळे पैशाची गरज भासली?
अ) गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभाव ब) नाशवंत वस्तूचा साठा करण्यात अडचणी
क) संपत्तीचे विभाजन करणे गैरसोयीचे असते. ड) प्रामाणिक मापकाचा अभाव
ई) कर्ज परतफेड करण्यात अडचणी
1) फक्त अ, ब, क 2) फक्त क आणि ड
3) अ, ब, क, ड 4) सर्व योग्य आहेत.
Which problems of barter system came up, which led to need of money?
a) Problem of double coincidence of wants b) Problem of storage of perishable goods.
c) It is inconvenient to divide property d) Lack of common measure of value
e) Problem of repayment of debt.
1) Only a, b, c 2) Only c and d
3) a, b, c, d 4) All are correct

---

3) खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने निवडा.
अ) कार्य पार पाडणारी वस्तू म्हणजे पैसा, असे वॉकर यांचे मत आहे.
ब) वस्तू खरेदी करण्याची शक्ती असलेली आणि त्या बदल्यात सामान्यपणे स्वीकृत असलेली वस्तू म्हणजे पैसा होय, असे सेलिग्मन यांचे मत आहे.
क) वस्तूच्या बदल्यात व्यापकपणे स्वीकृत असलेली वस्तू म्हणजे पैसा होय, असे रॉबर्टसन यांचे मत आहे.
1) फक्त अ आणि ब 2) फक्त क
3) फक्त ब आणि क 4) सर्व विधान योग्य आहेत.
Consider following statement and choose the correct sentence/s
a) According to Walker, Money is what money does.
b) According to Seligman, Money is a thing which has purchasing power and acceptable in general in exchange of goods.
c) According to Robertson, Money is a thing which is acceptable at large in exchange of goods.
1) Only a and b 2) Only c
3) Only b and c 4) All statements are correct



चाणक्य मंडल परिवार

4) प्रा. क्राऊथर यांची पैशाची व्याख्या ______ वर आधारित आहे .

1) कार्य
2) स्वीकृती
3) कार्य आणि स्वीकृती
4) यापैकी नाही

Definition of money, given by Prof. Crowther is based on ________.

1) Work
2) Acceptance
3) Work and acceptance
4) None of these.

---

5) खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने निवडा.

अ) संगणकीय पाकीट हे ई–पैशाचा प्रकार आहे.

ब) क्रेडिट कार्ड हे ई–पैशाचा प्रकार आहे.

1) फक्त अ विधाने योग्य आहे.
2) फक्त ब विधान योग्य आहे.
3) दोन्ही विधाने योग्य आहेत
4) दोन्ही विधाने योग्य नाहीत.

Consider following statement and choose the correct sentence/s

a) Digital Wallet is a type of E-Money.

b) Credit card is a type of E-Money.

1) Only a statement is correct
2) Only b statement is correct
3) Both statements are correct
4) Both statements are not correct.

---

6) खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने निवडा.

अ) धनादेश आणि विनिमय पत्रे यांना पर्यायी पैसा/ऐच्छिक पैसा म्हणतात.

ब) पर्यायी पैसा विधीग्राह्य असल्यामुळे नाकारता येत नाही.

1) फक्त अ विधाने योग्य आहे.
2) फक्त ब विधान योग्य आहे.
3) दोन्ही विधाने योग्य आहेत.
4) दोन्ही विधाने योग्य नाहीत.

Consider following statement and choose the correct sentence/s

a) Cheques and bills of exchange are known as optional money.

b) As optional money is legal tender money, it can't be refused.

1) Only a statement is correct
2) Only b statement is correct
3) Both statements are correct
4) Both statements are not correct.

---

7) अर्थतज्ज्ञ जे. एम. केन्स यांच्या मते "पैसा वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांच्यातील दुवा आहे." वरील वाक्य खालीलपैकी पैशाचे कुठले कार्य दर्शवते?

1) विलंबित देणी देण्याचे साधन
2) मूल्य हस्तांतरणाचे साधन
3) पतपैशाचा आधार
4) मूल्यसंचयनाचे साधन

According to J. M. Keynes, "Money is a link between the present and future".
Above sentence indicates which function of money given below?

1) Standard of deferred payment
2) Transfer of value
3) Basis of credit
4) Store of value

8) पैसा आणि त्यांची कार्ये याबाबत अयोग्य जोडी ओळखा.

अ) विनिमयाचे माध्यम – प्राथमिक कार्य

ब) मूल्य हस्तांतरणाचे साधन – दुय्यम कार्य

क) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन – प्राथमिक कार्य

ड) हिशोबाचे परिमाण - प्राथमिक कार्य

1) ब आणि ड 2) फक्त ड

3) फक्त क 4) सर्व जोड्या योग्य आहेत.

Identify incorrect pair about money and its function.

a) Medium of exchange – Primary function

b) Transfer of value – Secondary function

c) Measurement of national income - Primary function

d) Unit of account - Primary function

1) b and d 2) Only d

3) Only c 4) All pairs are correct.

---

9) खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने निवडा.

अ) पैशाची अनुषांगिक कार्ये ही प्रा. किन्ले यांनी सुचविली आहेत.

ब) शासकीय कर आकारणी आणि अर्थसंकल्प बांधणी हे पैशाचे अनुषांगिक कार्य आहे.

1) फक्त अ विधाने योग्य आहे. 2) फक्त ब विधान योग्य आहे.

3) दोन्ही विधाने योग्य आहेत 4) दोन्ही विधाने योग्य नाहीत.

Consider following statement and choose the correct sentence/s

a) Prof. Kinley suggested the contingent function of money.

b) Government tax collection and preparation of budget are the contingent function of money.

1) Only a statement is correct 2) Only b statement is correct

3) Both statements are correct 4) Both statements are not correct.

---

10) आभासी चलनावर भारताची काय भूमिका असावी, हे सुचवण्यासाठी भारत सरकारने 2017 मध्ये ______ यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली.

1) सुभाष गर्ग 2) बिमल जालान

3) पार्थसारथी शोम 4) नचिकेत मोर

Government of india appointed a committee under chairmanship of ____ to suggest what should be the stand of India about virtual currency.

1) Subhash Garg 2) Bimal Jalan

3) Parthsarathi Shome 4) Nachiket Mor

11) खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने निवडा.

अ) 8 नोव्हेंबर 2016 रोजी भारतात दुसऱ्यांदा विमुद्रीकरण केले गेले.

ब) त्यावेळी RBI चे गव्हर्नर उर्जित पटेल होते.

1) फक्त अ विधाने योग्य आहे.
2) फक्त ब विधान योग्य आहे.
3) दोन्ही विधाने योग्य आहेत
4) दोन्ही विधाने योग्य नाहीत.

Consider following statement and choose the correct sentence/s

a) India had its second demonetization on 8th November 2016.

b) At that time Urjit Patel was the governor of RBI.

1) Only a statement is correct
2) Only b statement is correct
3) Both statements are correct
4) Both statements are not correct.

---

12) खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने निवडा.

अ) पैशाचा संख्यात्मक सिद्धांताचा व्यवहार दृष्टिकोन मांडण्याचे श्रेय आयर्विंग फिशर यांना दिले जाते.

ब) पैशाचा संख्यात्मक सिद्धांताचा रोख शिल्लक दृष्टिकोन मांडण्याचे श्रेय आल्फ्रेड मार्शल यांना दिले जाते.

क) व्यवहार दृष्टिकोन सर्वोत्तम मानल्या जातो.

1) फक्त अ आणि ब
2) फक्त क
3) फक्त ब आणि क
4) सर्व विधान योग्य आहेत.

Consider following statement and choose the correct sentence/s

a) The credit of the transaction approach of Quantity theory of money goes to Irving Fisher.

b) The credit of the cash balance approach of Quantity theory of money goes to Alfred Marshall.

c) The transaction approach is considered the best.

1) Only a and b
2) Only c
3) Only b and c
4) All statements are correct

---

13) आयर्विंग फिशर चे MV=PT हे व्यवहार समीकरण आहे. हे समीकरण काय सुचवते?

1) पैशाचा पुरवठा वाढला तर महागाई वाढते.
2) पैशाचा पुरवठा वाढला तर पैशाचे मूल्य कमी होते.
3) अर्थव्यवस्थेतील एकूण विक्री आणि एकूण खर्च सारखे असते.
4) वरील सर्व पर्याय योग्य आहेत.

MV=PT is formula for transaction approach given by Irving Fisher. What this equation suggests?

1) If supply of money increases , inflation occours.
2) If supply of money increases , value of money decreases.
3) Total expenditure and total sales are same in economy.
4) All options are correct.



चाणक्य मंडल परिवार

14) पैशाच्या स्थिर मूल्यासाठी मौद्रिक व्यवस्थापन महत्त्वाचे आहे कारण..

1) पैशाचे मूल्य स्थिर राहत नाही.
2) अन्यथा सामाजिक आर्थिक समस्या निर्माण होण्याचा संभव असतो.
3) गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो.
4) 1 आणि 2 पर्याय योग्य आहेत.

Monetary management is important for steady value of money since...

1) Value of money don’t remain stable.
2) Otherwise there is possibility that it may cause socio economic problems.
3) It may impact on investment.
4) 1 and 2 are correct.

---

15) पतनिर्मिती क्षमतेनुसार चढता क्रम लावा.

1) चलनी नोटा व नाणी – बचत ठेवी – चालू ठेवी – मुदत ठेवी
2) चलनी नोटा व नाणी – चालू ठेवी – बचत ठेवी – मुदत ठेवी.
3) मुदत ठेवी - चलनी नोटा व नाणी – बचत ठेवी – चालू ठेवी
4) मुदत ठेवी – चालू ठेवी – बचत ठेवी – चलनी नोटा व नाणी

Arrange according to increasing potential of Credit creation.

1) Currency notes and coins – saving account – current account – Term deposits
2) Currency notes and coins – Current account – Saving account – Term deposits
3) Term deposits - Currency notes and coins – saving account – current account
4) Term deposits - current account – saving account - Currency notes and coins.

---

16) खालील विधाने विचारात घ्या आणि अयोग्य विधान/ने निवडा.

अ) M0 मध्ये बँकांकडील मागणी ठेवी मोजल्या जात नाही.
ब) M0 मध्ये रिझर्व्ह बँकेतील आंतराष्ट्रीय नाणेनिधीच्या ठेवी मोजल्या जात नाही.
क) M0 मध्ये CRR आणि SLR मोजला जात नाही.

1) फक्त ब आणि क
2) फक्त क
3) फक्त अ
4) सर्व विधान योग्य आहेत.

Consider following statement and choose the incorrect sentence/s

a) Demand deposits in bank are not calculated in M0.
b) Deposits of International Monetary Fund in Reserve bank are not calculated in M0
c) CRR and SLR are not calculated in M0.

1) Only b and c
2) Only c
3) Only a
4) All statements are correct



चाणक्य मंडल परिवार

17) देशातील पैसा M0, M1, M2, M3 या संकल्पना वापरुन मोजल्या जातो. या ठिकाणी “M” काय दर्शवतो?

1) पैशाचा गुणक
2) पैशाचा पुरवठा
3) पैशाचे मूल्य
4) पैशाची विनिमयता.

M0, M1, M2, M3 concept is used to measure money within country. Here, what does “M” indicate?

1) Multiplier of money
2) Supply of money
3) Value of money
4) Transaction ability of money

---

18) खालील घटक कुठल्या संकल्पनेत येतात ते ओळखा.

i) लोकांकडील तरल रोख
ii) बँकांचा स्वतःजवळील रोख साठा
iii) बँकांच्या RBI मधील ठेवी

अ) पायाभूत पैसा
ब) संचित पैसा
क) उच्च क्षमतेचा पैसा
ड) मुलभूत पैसा

1) अ, ब, क योग्य आहे.
2) अ, क, ड योग्य आहे.
3) ब, क, ड योग्य आहे.
4) अ, ब, क, ड योग्य आहे.

Identify the concept in which following factors.

i) Cash with people
ii) Cash deposits by banks with itself
iii) Deposits of banks at RBI

a) Monetary base
b) Reserve money
c) High power money
d) Basic money

1) a, b, c are correct.
2) a, c, d are correct.
3) b, c, d are correct.
4) a, b, c, d are correct

---

19) खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान/ने निवडा.

अ) M1 या संकल्पनेला संकुचित पैसा म्हणतात.
ब) M2 या संकल्पनेला विस्तृत पैसा म्हणतात.

1) फक्त अ
2) फक्त ब
3) दोन्ही विधाने योग्य आहे.
4) दोन्ही विधाने अयोग्य आहेत.

Consider following statement and choose the correct sentence/s

a) Concept of M1 is known as narrow money.
b) Concept of M2 is known as broad money.

1) Only a
2) Only b
3) Both statements are correct
4) Both statements are not correct



चाणक्य मंडल परिवार

20) पैसा गुणक म्हणजे ________
1) पैशाचा पुरवठा आणि पायाभूत पैसा यातील गुणोत्तर होय.
2) पैशाचा पुरवठा आणि संकुचित पैसा यातील गुणोत्तर होय.
3) पायाभूत पैसा आणि पैशाचा पुरवठा यातील गुणोत्तर होय
4) संकुचित पैसा आणि पैशाचा पुरवठा यातील गुणोत्तर होय.
Money multiplier means________
1) Ratio of supply of money and monetary base
2) Ratio of supply of money and narrow money
3) Ratio of monetary base and supply of money
4) Ratio of narrow money and supply of money

---

21) खालील विधाने विचारात घ्या आणि अयोग्य विधान/ने निवडा.
अ) चालणारी चलनवाढ अर्थव्यवस्थेला उपकारक असते.
ब) 10% पेक्षा जास्त दराने चलनवाढ झाल्यास मागणीत वाढ होत नाही.
1) फक्त अ 2) फक्त ब
3) दोन्ही विधाने योग्य आहे. 4) दोन्ही आणे अयोग्य आहेत.
Consider following statement and choose the correct sentence/s
a) Walking inflation is good for economy.
b) If inflation grows with rate more that 10%, it doesn’t increase demand.
1) Only a 2) Only b
3) Both statements are correct 4) Both statements are not correct

---

22) किंमतवाढीचे नियंत्रण करणे हे उद्दिष्ट पहिल्यांदा कुठल्या पंचवार्षिक योजनेत मांडले गेले?
1) पहिल्या 2) दुसऱ्या
3) तिसऱ्या 4) चौथ्या
In which five year plan, objective to control inflation was put forward?
1) First 2) Second
3) Third 4) Fourth

---

23) अचूक नसणारा पर्याय निवडा.
1) अप्रत्यक्ष करातील वाढ किंमतवाढीस कारणीभूत ठरतात.
2) लोकसंख्येतील वाढ किंमतवाढीस कारणीभूत ठरते.
3) बेरोजगारीतील वाढ चलनवाढीस कारणीभूत ठरते.
4) सर्व पर्याय अचूक आहेत.
Choose the option which is not correct
1) Increase in indirect taxes is responsible for rise in prices.
2) Increase in population is responsible for rise in prices.
3) Increase in unemployment is responsible for inflation.
4) All options are correct.



चाणक्य मंडल परिवार

24) सततची चलनघट मंदी निर्माण करते. अर्थव्यवस्थेत अशी स्थिती निर्माण झाल्यास कुठले राजकोषीय धोरण सर्वात योग्य ठरेल?

1) कर दरात वाढ करणे.
2) सार्वजनिक खर्च वाढवणे.
3) रिझर्व बँकेने सरकारी प्रतिभूती बाजारात विकणे.
4) सर्व पर्याय योग्य आहेत.

Continuous deflation creates recession. If such situation creates in economy, what kind of fiscal policy would be most appropriate?

1) To increase tax rates.
2) To increase public expenditure.
3) Reserve bank should sell government securities in market.
4) All options are correct.

---

25) महागाई नियंत्रणात आणण्यासाठी कोणत्या साधनाचा वापर केला जातो?

अ) सार्वजनिक वितरण व्यवस्था
ब) आयात शुल्कात कपात
क) आयात शुल्कात वाढ
ड) मौद्रिक धोरणात बदल.

1) अ, ब, क
2) ब, क, ड
3) अ, ब, ड
4) फक्त ब आणि ड

Which measures are used to control inflation?

a) Public distribution system
b) Reduction in import duties
c) Rise in import duties
d) Changes in monetary policy.

1) a, b, c
2) b, c, d
3) a, b, d
4) Only b and d

---

26) महागाईच्या कारणांचे कुठले दोन प्रकार आहेत?

अ) पुरवठा कमी कारणारी कारणे
ब) पुरवठा वाढवणारी कारणे
क) मागणी कमी कारणारी कारणे
ड) मागणी वाढवणारी कारणे

1) अ आणि क
2) अ आणि ड
3) ब आणि ड
4) ब आणि क

Which are the two types of causes of inflation?

a) Reasons for decrease in supply
b) Reasons for increase in supply
c) Reasons for decrease in demand
d) Reasons for increase in demand

1) a and c
2) a and d
3) b and d
4) b and c

चाणक्य मंडल परिवार

27) भारतीयांच्या दृष्टिने खालील पर्यायांपैकी अयोग्य पर्याय निवडा.

1) निर्यात वाढल्यामुळे मागणीताणजन्य चलनवाढ निर्माण होते.

2) सार्वजनिक खर्चात वाढ झाल्यास मागणीताणजन्य चलनवाढ निर्माण होते.

3) बँकांच्या पतनिर्मितीत क्षमतेत वाढ झाल्यास मागणी ताणजन्य चलनवाढ निर्माण होते..

4) सर्व पर्याय योग्य आहेत.

As per people of India, choose the incorrect option among following options.

1) Due to increase in exports, demand pull inflation gets created.

2) Due to increase in public expenditure, demand pull inflation gets created.

3) Due to increase in credit creation capacity of banks, demand pull inflation gets created.

4) All options are correct.

---

28) खालीलपैकी खर्च दाबजन्य चलनवाढीची कुठली कारणे नाही?

अ) काळा पैसा ब) परकीय गुंतवणूक

क) सट्टेबाजी ड) लोकसंख्या वाढ

1) अ आणि क 2) अ, ब आणि क

3) अ, ब आणि ड 4) फक्त ब आणि क

Which of the following are not the reason of cost push inflation?

a) Black money b) Foreign investment

c) Betting d) increase in population

1) a and c 2) a, b and c

3) a, b and d 4) Only b and c

---

29) खालील विधाने विचारात घ्या आणि अयोग्य विधान/ने निवडा.

अ) मागणी व पुरवठाचा नियम लागू न होणाऱ्या वस्तूंना, जिफेन वस्तू म्हणतात.

ब) सहसा जिफेन वस्तू दुय्यम वस्तू असतात.

क) मागणी आणि पुरवठ्याच्या बदलासोबत त्या वस्तूंच्या किंमतीत कधीच बदल होत नाही.

1) फक्त अ 2) फक्त ब

3) फक्त क 4) सर्व विधान योग्य आहे.

Consider following statement and choose the incorrect sentence/s

a) Those goods which don’t follow rules of supply and demand are known as Giffen goods.

b) Generally, Giffen goods are inferior goods.

c) Its prices never changes according to change in demand and supply.

1) Only a 2) Only b

3) Only c 4) All statements are correct.



चाणक्य मंडल परिवार

30) तुटीचा अर्थभरणा शासनाद्वारे केल्या जातो. त्याबाबत अयोग्य पर्याय निवडा.

1) या संकल्पनेचे श्रेय अर्थतज्ज्ञ केन्सला दिले जाते.
2) असा अर्थभरणा केल्यास अर्थव्यवस्थेत चलनवाढ निर्माण होते.
3) नवीन चलननिर्मिती करून केलेला अर्थभरणा सर्वोत्तम मानला जातो.
4) मागणीताणजन्य चलनवाढ निर्माण करण्यास मदत होते.

Deficit financing was done by government. Choose the incorrect option regarding same.

1) The economist Keynes is given the credit for this concept.
2) Due to such financing, inflation gets created in economy.
3) It is considered best option for financing if financed by printing of new currency.
4) It helps in creating demand pull inflation.

---

31) अर्थव्यवस्थेत वस्तूच्या किंमती कमी वा जास्त या प्रमाणात मागणी कमी वा जास्त होत असते. यालाच, मागणीची लवचिकता म्हणतात. जर चहाची किंमत वाढली तर कॉफीची मागणी वाढते, अशा लवचिकतेला _________ म्हणतात.

1) उत्पन्न लवचिकता
2) छेदक लवचिकता
3) किंमत लवचिकता
4) विरुद्ध लवचिकता

In economy if price of product rise or fall and accordingly demand rises or fall,such conditions are called as elasticity of demand. If prices of tea rises then demand for coffee increases. Such elasticity known as _________.

1) Income elasticity
2) Cross elasticity
3) Price elasticity
4) Opposite elasticity

---

32) मागणीची लवचिकता ही संकल्पना ________ यांनी सांगितली आहे.

1) आल्फ्रेड मार्शल
2) जे. एम. केन्स
3) ॲडम स्मिथ
4) उर्सुला हिक्स

The concept of elasticity of demand was proposed by ________.

1) Alfred Marshall
2) J.M. Keynes
3) Adam Smith
4) Ursula Hicks.

---

33) जेव्हा किंमती नेहमीपेक्षा अर्ध्यावर होत असतात आणि तरीही मागणीत चौपट वाढ होते तेव्हा मागणीची किंमत लवचिकता (Ed) _____ असते.

1) = 1
2) = 0
3) < 1
4) > 1

When prices falls by half ,compared to usual prices, and still demand in quantity of product raises 4 times, Then elasticity of demand (Ed) becomes______.

1) = 1
2) = 0
3) < 1
4) > 1



चाणक्य मंडल परिवार

34) चलनवाढीचे विविध घटकांवर सकारात्मक वा नकारात्मक परिणाम होत असतात. खालील पर्याय वाचून अयोग्य पर्याय निवडा.

1) शेतकऱ्यांवर चलनवाढीचा सकारात्मक परिणाम होतो.

2) बचतीवर चलनवाढीचा नकारात्मक परिणाम होतो.

3) ऋणकोंवर चलनवाढीचा सकारात्मक परिणाम होतो.

4) धनकोंवर चलनवाढीचा सकारात्मक परिणाम होतो.

There are positive and negative effects of inflation choose the incorrect option accordingly.

1) Inflation has positive effects on farmers.

2) Inflation has negative effects on savings.

3) Inflation has positive effects on debtor.

4) Inflation has positive effects on creditor.

---

35) चलनवाढीमुळे कुठल्या घटकावर नकारात्मक परिणाम होतो?

अ) बचत ब) गुंतवणूक

क) पेन्शनधारक ड) रोजगार निर्मिती

1) अ, ब आणि क 2) अ आणि क

3) अ, क आणि ड 4) अ आणि ड

Due to inflation which factors get negatively affected?

a) Savings b) Investment

c) Pensioner d) Employment generation

1) a, b and c 2) a and c

3) a, c and d 4) a and d

---

36) चलनघट रोखण्यासाठी सरकार कुठले उपाय करते?

अ) कर दरामध्ये कपात ब) निर्यात प्रोत्साहन

क) कर्जरोख्यांची मुदतपूर्व खरेदी ड) अनुदानात वाढ

1) अ, ब आणि क 2) अ, क आणि ड

3) फक्त अ आणि ड 4) अ, ब आणि ड

Which measures do government take to control deflation?

a) reduction in tax rates b) promotion to exports

c) premature purchase of debt bonds d) increase in grants.

1) a, b and c 2) a, c and d

3) Only a and d 4) a, b and d



चाणक्य मंडल परिवार

37) RBI ने परकीय गुंतवणुकीमुळे होणारी चलनवाढ रोखण्यासाठी 2004 साली ______ ही योजना सुरू केली.
1) बाजार स्थिरीकरण योजना
2) बाजार शाश्वतता योजना
3) बाजार भांडवलीकरण योजना
4) महाग पैसा योजना.
In order to control inflation due to foreign investment, RBI started _____ scheme, in 2004.
1) Market stabilization scheme
2) Market sustainability scheme
3) Market capitalization scheme
4) Dear money scheme.

---

38) भाववाढ नियंत्रण कुठल्या उपायामार्फत केले जाते?
अ) रेपो
ब) रोख राखीव गुणोत्तर
क) उलट रेपो
ड) आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे कर्ज
1) अ, ब आणि क
2) अ, क आणि ड
3) फक्त अ आणि ड
4) अ, ब आणि ड
By which measures inflation can be controlled?
a) Repo
b) Statutory liquidity ratio
c) Reverse repo
d) loan from International Monetary Fund
1) a, b and c
2) a, c and d
3) Only a and d
4) a, b and d

---

39) खालील विधाने विचारात घ्या आणि अयोग्य विधान/ने निवडा.
अ) घाऊक किंमत निर्देशांकात फक्त वस्तूंच्या किंमती मोजल्या केला जातो.
ब) ग्राहक किंमत निर्देशांकात फक्त सेवांच्या किंमती मोजल्या केला जातो.
1) फक्त अ
2) फक्त ब
3) अ आणि ब दोन्ही
4) एकही योग्य नाही.
Consider following statement and choose the incorrect sentence/s
a) Only prices of goods are calculated in wholesale price index.
b) Only prices of services are calculated in consumer price index.
1) Only a
2) Only b
3) Both a and b
4) None is correct

---

40) खालील विधाने विचारात घ्या आणि अयोग्य विधान/ने निवडा.
अ) 2010 पासून, घाऊक किंमत निर्देशांकासाठी अभिजित सेन कार्यगटाच्या शिफारशीवरून 2004-05 हे आधारभूत वर्ष मानले गेले.
ब) 2017 पासून, घाऊक किंमत निर्देशांकासाठी सौमित्र चौधरी कार्यगटाच्या शिफारशीवरून 2011-12 हे आधारभूत वर्ष मानले गेले.
1) फक्त अ
2) फक्त ब
3) अ आणि ब दोन्ही
4) एकही नाही.
Consider following statement and choose the incorrect sentence/s
a) Since 2010, on recommendation of Abhijit Sen Task force, 2004-05 is considered base year for wholesale price index.
b) Since 2017, on recommendation of Saumitra Chaudhary Task force, 2011-12 is considered base year for wholesale price index.
1) Only a
2) Only b
3) Both a and b
4) None

41) WPI आणि CPI मोजताना आधारभूत वर्षाला _______ समजले जाते.

1) 0 2) 1

3) 100 4) 1000

While calculating WPI and CPI base year is considered as ____.

1) 0 2) 1

3) 100 4) 1000

---

42) हेडलाईन घाऊक किंमत निर्देशांक मोजताना कुठल्या घटकांच्या किंमती विचारात घेतल्या जातात?

अ) प्राथमिक वस्तू ब) इंधन व उर्जा

क) साखर आणि कागद वगळता सर्व उत्पादित वस्तू. ड) सर्व उत्पादित वस्तू.

1) अ, ब आणि ड 2) अ आणि क

3) अ, ब, क 4) फक्त क

Which commodities are considered while calculating headline wholesale price index?

a) Primary products b) Fuel and energy

c) All manufactured product except sugar and paper d) All manufactured products

1) a, b and d 2) a and c

3) a, b, c 4) Only c

---

43) अयोग्य पर्याय निवडा.

1) घाऊक किंमत निर्देशांक मोजताना वस्तूंच्या किंमतीतून अप्रत्यक्ष कर वजा केला जातो.

2) घाऊक किंमत निर्देशांक मोजताना वस्तूंच्या किंमतीचा भूमितीय मध्य काढला जातो.

3) भारतात घाऊक किंमत निर्देशांक RBI द्वारा मोजला जातो.

4) सर्व पर्याय योग्य आहेत.

Choose the incorrect option.

1) While calculating Wholesale Price Index, Indirect tax is subtracted from price of goods.

2) While calculating Wholesale Price Index, geometric mean of prices is calculated.

3) In India, RBI calculates Wholesale Price Index.

4) All options are correct.

---

44) ग्राहक किंमत निर्देशांक मोजताना कुठल्या घटकाला सर्वाधिक भारांश आहे?

1) अन्नवस्तू व पेये 2) इंधन व प्रकाश

3) कापडे आणि पादत्राणे 4) घर

Which factor has highest weightage while calculating Consumer Price Index?

1) Food and beverages. 2) Fuel and light

3) Cloth and footwear 4) House.



चाणक्य मंडल परिवार

45) 2015 पासून ग्राहक किंमत निर्देशांकाचे_____ हे आधारभूत वर्ष मानले जाते.

1) 2011 2) 2012
3) 2013 4) 2014

Since 2015, year ______ is considered as base year for Consumer Price Index.

1) 2011 2) 2012
3) 2013 4) 2014

---

46) 1970 च्या दशकात भारतात प्रचंड महागाई वाढली होती. त्याबाबत कारणे आणि त्यांची वर्षे लक्षात घ्या. अयोग्य जोडी निवडा.

अ) 1971 – बांग्लादेश स्वातंत्र्य युद्ध
ब) 1972 – खरीप हंगामातील दुष्काळ
क) 1973 – तेलाचे संकट

1) फक्त अ 2) फक्त ब
3) फक्त क 4) एकही नाही

In 1970s, a huge inflation condition appeared in India. In that reference, consider the reasons and their years. Choose the incorrect pair.

a) 1971 – War of Bangladesh independence
b) 1972 – drought in kharif season
c) 1973 – crisis of oil

1) Only a 2) Only b
3) Only c 4) None.

---

47) 2014-15 नंतर भारतीय बाजारात किंमती घसरल्या होत्या. त्यासाठी भारत सरकारने कुठले उपाय केले होते?

अ) मनरेगा अंतर्गत दिल्या जाणाऱ्या मजुरीत वाढ
ब) बँकांचे विलीनीकरण
क) गृहक्षेत्रात गुंतवणूक

1) अ आणि क 2) अ आणि ब
3) फक्त क 4) अ, ब आणि क

After 2014-15 , prices came down in Indian market. Which measures did Indian government took?

a) Increase in wages given under MGNREGA.
b) Merger of banks.
c) Investment in housing.

1) a and c 2) a and b
3) Only c 4) a, b and c



चाणक्य मंडल परिवार

48) कुठल्या पंचवार्षिक योजनेमध्ये किंमती सतत कमी झाल्या होत्या?

1) पहिल्या
2) दुसऱ्या
3) तिसऱ्या
4) चौथ्या

In which five year plan, prices actually came down continuously?

1) First
2) Second
3) Third
4) Fourth

---

49) खालील विधाने लक्षात घ्या आणि अयोग्य विधान /ने निवडा.

अ) आजवर, भारतात सर्वाधिक महागाई दर (25.2%) वर्ष 1974 मध्ये होता.

ब) वर्ष 1991 मध्ये, महागाई दर 13.7% पर्यंत होता.

1) फक्त अ
2) फक्त ब
3) अ आणि ब दोन्ही
4) अ आणि ब दोन्ही नाही.

Consider the following sentences and choose the incorrect sentence/s.

a) Till now, highest inflation rate (25.2%) in India is observed in year 1974.

b) In year 1991, inflation was observed upto 13.7%.

1) Only a
2) Only b
3) Both a and b
4) Neither a nor b

---

50) सलग दोन तिमाहीपेक्षा जास्त कालावधीसाठी GDP मध्ये मध्यम स्वरूपाची घट येत असेल आणि चलनघट होत असेल तर त्या स्थितीला _______ म्हणतात

1) घसरण
2) मंदी
3) अवस्फिती
4) यापैकी नाही

If GDP falls at medium rate for more than two quarters in succession and deflation prevails, then such situation is known as _______.

1) Recession
2) Depression
3) Deflation
4) None of these

---

चाणक्य मंडल परिवार